महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक . : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.६६४/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ५०३ दिनांक २६ / ०३ / २०१५

विषय : नक्षलग्रस्त भागात कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात येत असलेल्या सोई-सवलतींबाबत.

संदर्भ : १) सा.आ. क्र.१२० (क), दि.०१.०७.१९८९.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.३७८ दि.२९.०१.२००३.

......

सामान्य आदेश क्र.१२० (क) दि.०१.०७.१९८९ मधील तरतुदींनुसार प्रशासकीय परिपत्रक क्र.३७८ दि.२९.०१.२००३ अन्वये शासन निर्णय क्र.टिआरएफ-२०००/प्र.क्र.३/बारा दि.०६.०८.२००३ च्या धर्तीवर नक्षलग्रस्त/आदिवासी भागात कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना विविध सोई-सवलती लगू करण्यात आलेल्या आहेत. तसेच शासनाने वेळोवेळी या संदर्भात जाहीर केलेल्या धोरणानुसार त्यात वाढ/बदल/सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

२. आता, गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र.एनएएक्स ०९१२/प्र.क्र.३६९/वि.शा.१-ब दि.२६.१२.२०१४ अन्वये राज्यातील सध्याच्या घोषित नक्षलग्रस्त जिल्हे व तालुके यांचा तसेच राज्यातील इतर भागाच्या नक्षलग्रस्तते संदर्भात आढावा घेऊन खालीलप्रमाणे भाग नक्षलग्रस्त म्हणून घोषित केले आहेत.

| अ.क्र. | जिल्हा | जिल्हयातील तालुके |
|---|---|---|
| १ | गडचिरोली | संपूर्ण जिल्हा |
| २ | गोंदिया | सालेकसा, देवरी, अर्जुनी मोरगाव व सडक अर्जुनी हे तालुके |

३. शासनाने उपरोक्तपणे नक्षलग्रस्न भागांचा घेतलेला आढावा व त्यानुसार पारित केलेल्या सुचनांच्या धर्तीवर सदर भागांमध्ये कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना पुरविण्यात आलेल्या सोई-सवलतींबाबतचा प्रस्ताव विचाराधीन होता. आता व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), सचालक (प्रकल्प) व संचालक (संचलन) यांचेशी विचारविनिमय करून शासन निर्णय दिनांक २६.१२.२०१४ च्या धर्तीवर गडचिरोली संपूर्ण जिल्हा आणि गोंदिया जिल्हयातील सालेकसा, देवरी, अर्जुनी मोरगाव व सडक अर्जुनी या तालुक्यांतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना यापुर्वी पुरविण्यात आलेल्या सोयी-सवलती यापुढेही चालू ठेवण्याबाबत मंजुरी प्रदान केली आहे.

४. तसेच गोंदिया, चंद्रपूर, यवतमाळ, भंडारा आणि नांदेड जिल्हयांतर्गत यापुर्वी नक्षलग्रस्त म्हणून घोषित करण्यात आलेले तालुके/गावे शासन निर्णय दि.२६.१२.२०१४ मध्ये समाविष्ट नसल्याने नक्षलग्रस्त भागाकरिता पुरविण्यात आलेल्या सोयी-सवलती सदर जिल्हे/तालुक्यांतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना लागू ठरत नाहीत. सबब, सदरच्या सोयी-सवलती जानेवारी २०१५ पासून बंद करण्यात येत आहेत.

५. सर्व संबंधित नियंत्रण अधिकारी यांनी उपरोक्त सूचनांचे अवलोकन करून त्या अनुषंगाने आपापल्या नियंत्रणाखालील कार्यालयामध्ये काटेकोरपणे अंमलबजावणीकरिता त्वरित कार्यवाही करण्यात यावी.

६. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

( संदेश ए. हाके )
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

D:\O&M\Adm.Cir.F.N.664.doc